ठाणे, शुक्रवार दि. २६ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ८८ पाने : ८, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**आरोप – प्रत्यारोपांचे राजकारण**

विधानसभा निवडणूक जवळ येत आहे तसे राजकीय नेत्यांचे आरोप – प्रत्यारोप वाढलेले दिसतात. महाविकास आघाडी सरकारमधील माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आता एक सनसनाटी आरोप केला आहे.
......पान ४ वर



अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आज (शुक्रवारी) ठाण्यातील शाळांना सुट्टी
...पान ३ वर

# ठाणे जिल्ह्यात मुसळधार

## नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली

**मुंबई/ पुणे : महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे आज जलमय झाली असून पुण्यातील कित्येक वर्षांचा रेकॉर्ड आजच्य पावसाने तोडला आहे. शहरातील अनेक भागात पाणीच पाणी झालं असून पाण्यातून मार्ग नागरिकांना काढावा लागत आहे. दुसरीकडे मुंबईतही मुसळधार पाऊस सुरू असून कल्याण, ठाणे आणि परिसरात पावसाच्या पाण्यामुळे तेथील नद्यांना पूर आला आहे. बदलापूरजवळील उल्हास नदीला पूर आला असून रस्तेही जलमय झाले आहेत. त्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने मोठा निर्णय घेतला आहे. सध्या कर्जत ते कल्याण वाहतूक बंद असून पुणे–मुंबई मध्य रेल्वे मार्गावरील काही महत्त्वाच्या एक्सप्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे, पुण्याला जाणाऱ्या आणि पुण्याहून मुंबईकडे येणाऱ्या प्रवाशांचे हाल होत आहेत.**

पुण्यात पावसामुळे आज जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. पालकमंत्री अजित पवार यांनीही पुण्यातील काही भागांत दौरा करुन पाहणी केली. तर, प्रशासनही अलर्ट मोडवर आहे. त्यातच, मध्य रेल्वे प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुंबई पुणे डेक्कन क्वीन एक्सप्रेस, मुंबई पुणे प्रगती एक्सप्रेस आणि पुणे मुंबई इंटरसिटी एक्सप्रेस आज २५ जुलै रोजी रद्द करण्यात आल्या आहेत. तर, आज (शुक्रवार) सकाळी पुणे–मुंबई डेक्कन एक्सप्रेस, पुणे–मुंबई प्रगती एक्सप्रेस आणि मुंबई पुणे इंटरसिटी एक्सप्रेसही रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे, पुणे–मुंबई व मुंबई–पुणे येथील प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली आहे.



■ सर्व शाळा व महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर

### उल्हास नदीची पातळी वाढली

मुंबईत अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस होत आहे, त्याशिवाय हवामान विभागाकडून रेड अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. हे पाहता मुंबई महापालिका प्रशासनाने मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या पहिली ते बारावीच्या शाळांना आज सुट्टी देण्यात आली आहे. तर, मध्य रेल्वेनेही पुणे–मुंबई रेल्वे मार्गावरील अनेक एक्सप्रेस ट्रेन्स रद्द केल्या आहेत. बदलापूर आणि वांगणी दरम्यान उल्हास नदीच्या पाण्याच्या पातळीचा अंदाज घेऊन या एक्सप्रेस रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मध्य रेल्वे सांगितले आहे. सध्या कर्जत ते कल्याण वाहतूक बंद आहे.

### पुण्यात पाणी जास्त, प्रशासन कामी

पुण्यात जोरदार पाऊस सुरु असून प्रशासन कमी पडत असल्याची टीका भाजपचे नवनिर्वाचित आमदार अमत् गोरखे यांनी केली आहे. येत्या दोन दिवसात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रशासनाने आणखी तयारी करून पाणी साचण्यामागील नेमके कारणांचा शोध घेऊन ती दूर करण्याची मागणी आमदार गोरखे यांनी केली आहे.



### कल्याणमध्ये २०० नागरिकांच्या घरात पाणी

कल्याण मधील शिवाजीनगर परिसरामध्ये वालधुनीच्या कडेला असणाऱ्या २०० हून अधिक नागरिकांच्या घरांमध्ये गुडघाभर पाणी शिरले आहे. येथील नागरिकांचे स्थलांतर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने केले आहे. मात्र, संसार उध्वस्त झाल्याने नागरिक भयभीत झाल्याचं दिसून आलं.

## मुसळधार पावसाने मुंबईकरांची चिंता मिटवली, चार तलाव ओसंडून वाहू लागले, पाणीकपात मागे

मुंबई: गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या मुंबईकरांची वर्षभराची पाण्याची चिंता जवळपास मिटल्यात जमा आहे. कारण, गेल्या आठवडाभरात मुंबईत झालेल्या पावसामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणारे विहार, तुळशी, तानसा, मोडकसागर ही चार जलाशये ओसंडून वाहू लागली आहेत. त्यामुळे मुंबईत सध्याच्या घडीला लागू असलेली १० टक्के पाणीकपात रद्द होणार आहे. पुढील आठवड्यापासून पाणीकपात रद्द करण्याचा हा निर्णय लागू होणार आहे.

**मुंबईतील पाणीकपात रद्द होणार**

या संपूर्ण स्थितीचा आढावा लक्षात घेता, मुंबई महानगराच्या पाणीपुरवठ्यात सध्या लागू असलेली १० टक्के पाणीकपात ही सोमवार दिनांक २९ जुलै २०२४ पासून मागे घेण्यात येत आहे. तसेच, ठाणे शहर, भिवंडी व नगर बाह्य विभागातील ग्रामपंचायतींना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून होणा–या पाणीपुरवठ्यातील १० टक्के कपात देखील सोमवार दिनांक २९ जुलै २०२४ पासून मागे घेण्यात येत आहे.

## पूर्वीच रखडलेल्या पोलीस भरतीला अतिवृष्टीचा फटका- भरती प्रक्रिया दोन दिवस पुढे ढकलली

ठाणे – ठाण्यात आठवडाभर मुसळधार पाऊसाने घाई घेतल्याचा फटका ठाणे शहर पोलिस भारती प्रक्रियेला अतिवृष्टीच्या इशाऱ्याने नियोजित पोलीस भरती शुक्रवारी(२६ जुलै)आणि शनिवारी(२७ जुलै) होणारी भरती प्रक्रिया पुढे ढकलण्यात आलेले असून त्या चाचण्या १ ऑगस्ट आणि २ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार असल्याची माहिती ठाणे शहर पोलिस आयुक्तांलयाद्वारे प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई संवर्गातील ६६६ व चालक पोलीस शिपाई संवर्गातील २० रिक्त पदे भरण्याकरिता सन २०२२–२०२३ ची भरती प्रक्रिया १० जून, २०२४ पासून सुरू करण्यात आलेली होती. ज्या उमेदवारांना या निर्धारित कालावधीत महिला उमेदवार यांची शारिरीक मोजमाप आणि मैदानी चाचणी साकेत मैदान, राबोडी, ठाणे पश्चिम येथे शुक्रवारी(२६ जुलै)आणि शनिवारी(२७ जुलै) रोजी निश्चित करण्यात आली होती. त्या उमेदवारांच्या भरती प्रक्रियेच्या चाचण्या या १ ऑगस्ट आणि २ ऑगस्ट,२०२४ अशा निर्धारित करण्यात आलेल्या आहेत. उमेदवारांनी अधिक माहितीसाठी ू.िंहरपर्शेश्रिळलश.र्सौं.ळप या संकेतस्थळावर भेट देऊन माहिती घ्यावी असे आवाहनही ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. किंवा ठाणे पोलीस नियत्रंण कक्ष, ०२२–२५४४३६३६/०२२–२५४४२८२८/२५८८३५३५१ यावर , किंवा सुनील दुबेले व लिपीक : ९५९४९७००९६, २५१७१२४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन ठाणे पोलिसांनी केली आहे

## प्रवाशांचे होणार हाल! मध्य रेल्वे घेणार ६ दिवसांचा मेगाब्लॉक, पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वेगाड्या होणार रद्द



मुंबई–पुणे प्रवास करणाऱ्यांसाठी रेल्वे प्रशासनाकडून एक महत्त्वाची अपडेट जाहीर करण्यात आली आहे. मध्ये रेल्वेच्या पुणे विभागात सहा दिवसांचा मेगाब्लॉक घेतला जाणार आहे. दौंड रेल्वे स्थानकातील विविध कामांसाठी हा ब्लॉक घेतला जाणार आहे. २७ जुलै ते १ ऑगस्ट दरम्यान हा ब्लॉक असणार आहे. या काळात अनेक गाड्या रद्द करण्यात येणार आहेत. तर काही रेल्वेगाड्यांचे मार्ग बदलले जाणार आहेत. रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, मध्य रेल्वेच्या या सहा दिवसांच्या ब्लॉकमुळे पुणे विभागातील १९ रेल्वेगाड्या रद्द करण्यात येतील. तर २२ एक्स्प्रेसचे मार्गही बदलले जातील. यादरम्यान सोलापूर–पुणे इंटरसिटी एक्सप्रेस ३ दिवसांसाठी रद्द करण्यात येणार आहे. ही ट्रेन ३ दिवस रद्द केल्याने प्रवाशांची तारांबळ उडणार आहे.



# अतिवृष्टीमुळे दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षेतील आजचा पेपर लांबणीवर

पुणे : राज्याच्या काही जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी (२६ जुलै) अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येत असलेल्या दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षेतील २६ जुलै रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य मंडळाच्या सहसचिव मेधा निरफराके यांनी परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य मंडळातर्फे दहावीची पुरवणी परीक्षा १६ जुलै ते ३० जुलै या कालावधीत, तर बारावीची परीक्षा १६ जुलै ते ८ ऑगस्ट या कालावधीत होत आहे. मात्र राज्याच्या विविध भागांमध्ये अतिवृष्टीसदृश्य पाऊस पडत आहे. तसेच २६ जुलै रोजी राज्याच्या काही भागांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे या दिवशी होणारी दहावीची विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग या विषयाची परीक्षा पुढे ढकलून ती ३१ जुलै रोजी सकाळी अकरा ते एक या वेळेत घेतली जाणार आहे. तर बारावीची वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन, अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान, एमसीव्हीसी पेपर २ या विषयांची परीक्षा पुढे ढकलून ती ९ ऑगस्ट रोजी घेतली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. परीक्षेच्या अन्य वेळापत्रकाध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, असे स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षेतील गुरुवारची परीक्षा नियोजनानुसार पार पडली. पावसामुळे विद्यार्थ्यांना अडचण आल्याची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तशी मागणी आल्यास संबंधित विद्यार्थ्यांच्या फेरपरीक्षेबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेतला जाईल, असे राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी सांगितले.

# कल्याण-मुरबाड रस्ता जलमय

कल्याण : मुसळधार पावसामुळे उल्हास, काळू नद्यांना महापूर आला आहे. या नद्यांचे पाणी परिसरातील गाव हद्दीत शिरल्याने कल्याण-मुरबाड रस्ता अनेक गाव हद्दीत जलमय झाला आहे. या रस्त्यावरील कल्याण ते अहमदनगरकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. नगरकडून भाजीपाला, दूध घेऊन येणारी मालवाहू वाहने जागोजागी अडकून पडली आहेत.

मुरबाड रस्त्यावरील किशोर गाव परिसरात पुराचे पाणी घुसले आहे. टोकावडे गावाजवळील हेदवली पूल पाण्याखाली गेल्याने गाव परिसराचा इतर गावांशी संपर्क तुटला आहे. मुरबाडी नदी दुथडी वाहत आहे. या नदी काठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. उल्हासनगर जवळील म्हारळ, कांबा भागात पुराचे पाणी शिरल्याने या भागातील मुरबाड रस्ता जलमय झाला आहे. वाहन चालक आव्हान स्वीकारून या पुराच्या पाण्यातून बाहेर पडून सुरक्षित ठिकाणी पोहचण्याचा प्रयत्न करत आहेत. मुरबाड-कल्याण मार्गावर एस. टी. महामंडळाच्या बस अनेक ठिकाणी खोळंबून राहिल्या आहेत. पहाटे तीन ते चार वाजता कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात भाजीपाला घेऊन दाखल झालेली मालवाहू वाहने परतीच्या वाटेवर कल्याण, मुरबाड परिसरात अडकून पडली आहेत. उल्हास आणि काळू नद्या टिटवाळा, बदलापूर, जांभूळ, मोहने भागात इशारा पातळी ओलांडून वाहत आहेत.

# ठाण्यात मुसळधार पावसात गुरुवारी झाडे पडण्याच्या घटना

ठाणे - ठाण्यात मागील अनेक दिवसापासून मुसळधार पावसाची संततधार सुरू आहेथ. त्यामुळे ठाण्यात पडझडीच्या घटनांना वेग आला आहे. गुरुवारी ठाण्यात आगीच्या दोन घटना तर पाणी साचण्याची एक आणि झाड कोसळल्याच्या सात घटना घडल्या आहेत.यात झाड पडून एक इसम जखमी झाल्याची घटना घडली असतानाच आगीच्या घटनांमध्ये एक ३७ वर्षीय महिलेचा हात किरकोळ भाजला. मागील आठवड्याभरात पाऊसाने जोरदार मुसंडी मारलेली आहे. गुरुवारी ही ठाण्यात पावसाची रिपरीप सुरूच होती. बुधवारी मध्यरात्रीनंतर आणि गुरुवारी पहाटे सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास ठाण्याच्या चरे परिसरातील परफेक्ट ड्रायव्हिंग स्कूल, तलावपाली जवळ, असलेल्या सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयाची दोन माळ्याच्या इमारती दुसऱ्या माळ्यावर इंटरनेट सेवा देणाऱ्या इंटरनेट बॉक्सला आणि ताडपत्री याला आग लागली. विद्युत पुरवठा महावितरण कर्मचारी यांच्याकडून खंडित करण्यात आला असून लागलेली आग पूर्णपणे विझवण्यात आली.













'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१

ठाणे, शुक्रवार दि. २६ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ८८ पाने : ८, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन १३ वर्षांची यशस्वी घोडदौड

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे



अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची आपत्कालीन मदत यंत्रणा कार्यरत
...पान ६ वर

नवी मुंबई महानगरपालिकेची आपत्कालीन मदत यंत्रणा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार दक्षतेने सज्ज !
...पान ७ वर





गोविंदांसाठी खुशखबर, राज्य शासनाने घेतला मोठा निर्णय

# ७५ हजार गोविंदांना शासनाकडून विम्याचे संरक्षण

मुंबई : राज्यातील ७५ हजार गोविंदांना विम्याचे संरक्षण देण्याचा निर्णय महायुती सरकारने गुरुवार, दि. २५ जुलै रोजी घेतला. दहिहंडी उत्सवामध्ये मानवी मनोरे रचतांना अपघात किंवा दुर्घटना घडून दुर्दैवी मृत्यू आल्यास, २ अवयव किंवा १ डोळा निकामी झाल्यास, किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास शासनाकडून १० लाख रुपये इतके विम्याचे संरक्षण देण्यात आले आहे. एक हात, एक पाय किंवा एक डोळा गमावल्यास ५ लाख रुपये इतके विम्याचे संरक्षण देण्यात आले आहे. राज्यातील ७५ हजार गोविंदांसाठी शासनाने विम्याचे संरक्षण दिले आहे. वर्ष २०२३ मध्येही राज्यशासनाने गोविंदांना विम्याचे संरक्षण दिले होते.

## दुध भेसळखोरांविरोधात होणार कठोर कारवाई, राज्य सरकार करणार स्वतंत्र कायदा

दुध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी एमपीडीएपेक्षाही कठोर असा राज्याचा स्वतंत्र कायदा करावा लागेल. तसेच अन्न पदार्थातील भेसळखोरांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल व्हावा यासाठी केंद्राला शिफारस करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल येथे सांगितले. राज्यातील दुधातील भेसळखोरांविरोधात अन्न व औषध प्रशासन आणि दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी संयुक्त मोहीम प्रभावीपणे राबवून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी व्ही. रमणी पॅटर्न राबविणे तसेच राज्यातील दुध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळीविषयी आयोजित संयुक्त बैठकीत मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीत मंत्री मंडळाच शिस्तमंडळ उपस्थित होते.

## जिल्हा परिषदेच्या पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर भरती

ठाणे – जिल्हा परिषद ठाणे, प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या कालावधीसाठी मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांमधून पात्र उमेदवारांची उपशिक्षक, पदवीधर शिक्षक या पदावर एकत्रित मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी समक्ष अर्ज मागविण्यात येत आहे.

एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने सेवानिवृत्त शिक्षक नेमणूका या पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये नियमित शिक्षक भरती होईपर्यंत करण्यात येत आहेत. उमेदवाराचे नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष असणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त असलेले शिक्षक, कंत्राटी शिक्षक पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील. मासिक मानधन रुपये २०,०००/– प्रतिमाह (इतर कोणतेही लाभाव्यतिरिक्त) दिले जाईल.


इच्छुक उमेदवारांनी अर्ज दि. २६ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) ठाणे जिल्हयातील आपल्या लगतच्या / सोयीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती अंबरनाथ, भिवंडी, कल्याण, मुरबाड व शहापूर या कार्यालयात जमा करावेत. तसेच अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषद ठाणेच्या **https://zpthane.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरून घ्यावे असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी ठाण्यातील शाळांना सुट्टी – आयुक्त

ठाणे – ठाणे शहरात आज पहाटेपासूनच पावसाची संततधार सुरू असून एका दिवसात १८० मि.मी इतका पाऊस झालेला आहे. तसेच हवामानखात्याने रेड ॲलर्ट जाहीर केला होता, त्यानुसार पूर्वतयारी म्हणून आपत्कालीन यंत्रणा कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज ठेवण्यात आली आहे. आज झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी ठाणे महापालिकेतील आपत्कालीन कक्षास भेट देवून दिवसभरातील परिस्थितीचा आढावा घेतला, तसेच उद्या देखील मोठी भरती असल्याने महापालिका हद्दीतील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे आदेश आयुकांना संबंधितांना दिले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, सचिन पवार, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वाय. एम. तडवी आदी उपस्थित होते.

शुक्रवारी देखील मोठी भरती असून रेड ॲलर्ट जाहीर केला असल्याने महापालिका हद्दीतील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली असल्याचेही आयुक्तांनी यावेळी नमूद केले. तसेब नागरिकांकडून आपत्ती व्यवस्थापन कक्षास प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याच्या दृष्टीने प्रभाग समिती निहाय यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच शहरातील सखल भागात पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीकोनातून पंप बसविण्यात



आले असून पुरेसे मनुष्यबळ व आवश्यक साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले असल्याचेही आयुक्तांनी यावेळी सांगितले. वागळे प्रभाग समिती परिसरातील पडवळनगर, किसननगर, भटवाडी जनता झोपडपट्टी, श्रीनगर या परिसरात साचलेल्या पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करण्यात आल्या असून महापालिकेच्या आपत्कालीन विभागाचे कर्मचारी या ठिकाणी तैनात करण्यात आले होते.

तसेच अतिवृष्टीमुळे मुंब्रा परिसरातील खडी मशीन रोड व भीमनगर येथील रस्ता खचल्यामुळे आपत्कालीन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सदरची परिस्थिती नियंत्रणात आणून सदर ठिकाणचा रस्ता वाहतुकीसाठी तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आला आहे. शहरात ठिकठिकाणी पावसामुळे उन्मळून पडलेली झाडे तातडीने हटविण्याची कार्यवाही सुरू आहे.

### आपत्कालीन कक्षास भेट, दिवसभरातील परिस्थितीचा घेतला आढावा....

- नागरिकांची गैरसोय होवू नये यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन विभागात २० पेक्षा जास्त फोनची सुविधा २४X७ कार्यान्वित आहेत. तसेच आलेल्या प्रत्येक फोनच्या तक्रारीचे निवारण पूर्ण होईपर्यंत संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला जात असल्याचेही आयुकत सौरभ राव यांनी नमूद केले.
- आज झालेल्या पावसामुळे नौपाडा–कोपरी परिसरातील पेढ्या मारुती मंदिर, वंदना सिनेमा परिसर, सिडको बस डेपो, चिखलवाडी, बारा बंगला, मेंटल हॉस्पिटल परिसर या ठिकाणच्या सखल भागात साचलेल्या पाण्याचा उपसा करण्यासाठी पंप बसविण्याची कार्यवाही करुन पाण्याचा निचरा करण्यात आला.
- तसेच कोपरी नौपाडा प्रभाग समिती कार्यक्षेत्रात परिमंडळ उपायुक्तांनी भेटी देवून सी १ आणि सी २ या धोकादायक व अतिधोकादायक इमारती रिकामी करण्याची कार्यवाही करण्यात आली.

## राष्ट्रपती भवनातील अशोक आणि दरबार हॉलची नावं बदलली!

नवी दिल्ली – दिल्लीतील ऐतिहासिक राष्ट्रपती भवनातील अशोक हॉल आणि दरबाल हॉलची नावे बदलण्यात आली आहेत. राष्ट्रपती भवनकडून याबाबत माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार दरबार हॉलला गणतंत्र मंडप असे नाव देण्यात आले आहे. तर अशोक हॉल या नावातील केवळ हॉल बदलून त्याऐवजी मंडप असे करण्यात आले आहे.

दरबार हॉलमध्ये राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केले जातात. तसेच भवनातील अनेक महत्वाचे कार्यक्रमही याच हॉलमध्ये होतात. नावांमधील बदलांबाबत स्पष्टीकरण देताना राष्ट्रपती भवनाकडून सांगण्यात आले आहे की, प्रजासत्ताकाची (गणतंत्र) भावना प्राचीन



काळापासून भारतीय समाजाच्या मनात रुजली आहे. त्यामुळे दरबार हॉलसाठी गणतंत्र मंडप या जागेसाठी योग्य नाव आहे. अशोक हॉलचे नाव बदलताना भाषेतील एकरुपतेचा हवाला देण्यात आला आहे. अशोक मंडप हे नाव भाषेत एकरुपता आणते आणि इंग्रजीकरणाचे अस्तित्व मिटवते. सर्व कष्टातून मुक्त झालेला व्यक्ती किंवा कोणत्याही दु:खाशी न जोडला गेलेला व्यक्ती असा अशोकचा अर्थ आहे. अशोक हे नाव सम्राट अशोक यांच्याशी जोडले गेलेले आहे, जे एकता आणि शांतीचे प्रतिक आहे, असे राष्ट्रपती भवनने दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे. भारत प्रजासत्ताकाचे राष्ट्रीय प्रतिक सारनाथमध्ये अशोक चिन्ह आहे. हा शब्द अशोक वृक्षालाही संदर्भित करतो. त्याचा भारतीय धार्मिक परंपरेसोबतच कला आणि संस्कृतीतही मोठे महत्व आहे, असे स्पष्टीकरण राष्ट्रपती भवनकडून देण्यात आले आहे.




# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## आरोप – प्रत्यारोपांचे राजकारण

विधानसभा निवडणूक जवळ येत आहे तसे राजकीय नेत्यांचे आरोप – प्रत्यारोप वाढलेले दिसतात. महाविकास आघाडी सरकारमधील माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आता एक सनसनाटी आरोप केला आहे. मला उद्धव ठाकरे यांनी महापालिका निवडणुकीसाठी पैसे मागितले असा आरोप करण्यास सांगण्यात आले होते. मी तो आरोप केला नाही. तसेच आदित्य ठाकरे यांनी दिशा सालियानवर बलात्कार करून बाल्कनीतून ढकलून दिल्याचा आरोप सुद्धा करण्यास सांगण्यात आले होते, पण मी ते आरोप केले नाहीत, असा सनसनाटी दावा महाविकास आघाडी सरकारमधील गृहमंत्री राहिलेल्या अनिल देशमुख यांनी केला आहे. शिवाय अनिल देशमुख यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर काही आरोप केले होते. त्यानंतर त्यांना उत्तर देताना, माझ्याकडे क्लिप्स आहेत, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले होते. देवेंद्र फडणवीसांनी माझ्याकडे क्लिप्स आहेत असे म्हटल्यानंतर आता अनिल देशमुखांनी थेट त्यांना आव्हान दिले आहे. हे आरोप – प्रत्यारोप वाढत जाणार आहेत, असे दिसते. मी सांगितले होते की, फडणवीसांनी मला उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अनिल परब आणि अजित पवार विरोधात अफिडेविट करण्यास सांगितले होते. मी ते पुराव्या शिवाय बोललेलो नाही.(हातातला पेन ड्राईव्ह दाखवत) पेन ड्राईव्ह मध्ये सर्व पुरावे आहेत, असे अनिल देशमुख म्हणाले आहेत. शिवाय श्याम मानव यांनी केलेला दावा खरा असल्याचेही देशमुख यांनी म्हटले आहे. अनिल देशमुख यांनी फडणवीसांना आव्हान देताना म्हटले आहे की, देवेंद्र फडणवीसांनी त्यांच्याकडे काही क्लिप्स असल्याचा दावा केला. देशमुखांनी फडणवीसांना असेही म्हटले आहे की, त्यांनी ते क्लिपिंग जनतेसमोर आणावे. मला माहित आहे त्यांच्याकडे कुठलीही क्लिप्स नाही. त्यामुळे मी दावा करतो की, त्यांनी त्या क्लिपिंग समोर आणाव्यात. माझ्याकडे जे पुरावे आहेत ते योग्य वेळ आल्यावर मी समोर आणेन, असे आव्हान अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीसांना दिले आहे. तीन वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीसांनी त्यांच्या अतिशय जवळचा माणूस माझ्याकडे पाठवला. त्या माणसाने माझे देवेंद्र फडणवीसांशी बोलणे करुन दिले. अनेकदा त्याने बोलणे करुन दिले. त्यांनी चार मुद्यांचे अफिडेविट करुन द्या असेही सांगितले होते. मी तसे केले असते तर उद्धव ठाकरे, अजित पवार आणि आदित्य ठाकरे अडचणीत आले असते. मी त्यांना सांगितले की, अनिल देशमुख कोणावरही खोटे आरोप करणार नाही, असेही देशमुख यांनी म्हटले आहे. महा विकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांमध्ये अशाप्रकारे सातत्याने आरोप – प्रत्यारोप सुरू असल्याचे दिसते. परंतु या आरोपांचा जनतेला काहीच लाभ नाही. जनतेने लोकशाही मार्गाने निवडून दिले प्रतिनिधी जर एकमेकांमध्ये लढू लागले तर जनतेने काय करायचे ? असा प्रश्न निर्माण होतो. राजकीय नेते जर हेवेदाव्यांत वेळ वाया घालवत असतील तर दोष नेमका कुणाला द्यायचा ?

# अतिवृष्टीमध्ये महापालिका यंत्रणा सतर्क असून, काही आपत्कालीन उपस्थिती उद्भवल्यास नागरीकांनी महापालिकेच्या आपत्कालीन विभागाशी संपर्क साधावा ! – महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़



कल्याण – महापालिका परिक्षेत्रात गेले काही दिवस सातत्याने मुसळधार पर्जन्यवृष्टी होत आहे. आज दिवसभरात १०९ ııı पर्जन्यवृष्टी महापालिका परिक्षेत्रात झाली. या पावसाळी आपत्कालीन परिस्थितीत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, महापालिकेचे अभियंते,सहा आयुक्त सर्व प्रभागात कार्यरत असून महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी देखील महानगरपालिकेच्या इन्टीग्रेटेड कंट्रोल न्ड कमांड सेंटर (ICCC) मधून पावसाळी आपत्कालीन परिस्थितीचा आढावा घेतला. महापालिका परिक्षेत्रात गेले काही दिवस सातत्याने मुसळधार पाऊस पडत असून, उल्हास व काळु नदी धोकादायक पातळी जवळ आल्यामुळे नागरीकांनी सावध रहावे आणि महत्वाच्या कामांशिवाय घराबाहेर पडू नये, तसेच काही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास महापालिकेच्या आपत्कालीन टोल फ्री क्रमांक( अ) पाणी साचणे तसेच ड्रेनेज विषयक तक्रारी – १८००२३३४३९२, ब) वृक्ष पडणे/आग लागण्याची घटना – १८००२३३७३८३ व क) धोकादायक इमारत/भुसख्खलन/ रस्त्यावरील खड्डे– १८००२३३००४५) यावर संपर्क करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी केले.

महापालिकेच्या १/अ प्रभागातील सखल भागात आज पाणी साचल्यामुळे येथील सुमारे १०० नागरीकांना शहाड येथील पाटीदार भवन येथे स्थलांतरीत करण्यात आले . तसेच जेवणाची व्यवस्था करण्यात आली.

३/क प्रभागात आण्णाभाऊ साठे नगर,रेतीबंदर परिसरात पाणी साचल्यामुळे तेथील नागरीकांसाठी स्थलांतराची यंत्रणा सज्ज ठेवली असून, आवश्यकतेनुसार जेवणाची व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच डॉक्सी गोळ्यांची व ओआरएसएल चे वाटप करण्यात आले.

५/ड प्रभागात सावरकर नगर येथे पाणी साचल्यामुळे तेथे सक्शनपाईप लावून पाण्याचा निचरा करण्यात आला, सखल भागात पाणी शिरलेल्या भागातील नागरीकांसाठी जाईबाई शाळा येथे नागरीकांसाठी व्यवस्था महापालिकेमार्फत करण्यात आली आहे. ४/जे प्रभागात अशोकनगर, वालधुनी परिसरातील लोकांसाठी बुध्दविहार तसेच महापालिका शाळा क्र. १६ येथे राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

९/आय प्रभागातील द्वारली येथे साचलेल्या पाण्यात २ सक्शन पंप लावून निचरा करण्यात येत आहे.

८/ग प्रभागात बालाजी गार्डनच्या पाठीमागे असलेल्या चाळीत पाणी भरल्याने तेथील रहिवाशांना महापालिका शाळा क्र. २१ मध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

महापालिकेच्या आरोग्य पथकाने पाटीदार भवन येथील स्थलांतरीत केलेल्या नागरीकांची आरोग्य तपासणी केली, त्यांचे रक्तनमूने घेण्यात आले आणी डॉक्सी गोळ्यांचे वाटप करण्यात आले. वालधुणी अशोकनगर परिसरातील उर्दु शाळा परिसर, जगदिश तबेला, शिवाजीनगर येथील होम टॉवर, सातारकर चाळ येथील पुर संभाव्य परिसरात डॉक्सी गोळ्यांचे वाटप करण्यात आले. भवानीनगर, धावडेश्वर चाळ, जयदुर्गा व इतर परिसरात डॉक्सी गोळ्यांचे वाटप करण्यात आले.

# पूर परिस्थितीत प्रशासन मदतीसाठी फिल्डवर बचाव कार्य व्यवस्थित सुरू– मुख्यमंत्री

मुंबई – मुंबई, पुणे, रायगड परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी सुरू आहे, मात्र जिल्हा, मनपा प्रशासन सज्ज असून हे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी हे फिल्डवर आहेत, ज्या ज्या ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती आहे तिथले बचाव कार्य वेगाने सुरु आहे. काळजीचं कारण नाही, मात्र नागरिकांनी देखील आवश्यकता असल्यास घराच्या बाहेर पडावं असं आवाहन मी करतो असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

एनडीआरएफ, एसडीआरएफच्या तुकड्या, लष्कर, नौदल, पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य यंत्रणा या सर्वांना एकमेकात

## आर्मी, नेव्हीच्या तुकड्या देखील सज्ज

समन्वय ठेवून आवश्यकतेप्रमाणे मदत करण्याचे निर्देश देण्यात आल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्री म्हणाले की, एक टीमवर्क म्हणून काम करून पूर परिस्थितीतल्या लोकांना सुरक्षित हलविणे, त्यांना अन्नाची पाकिटे देणे, औषध, पाण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. वेळप्रसंगी एनडीआरएफ, लष्कर, नौदल यांची मदत घेण्याच्या सूचना केल्या आहेत. पुणे, मावळ, मुळशी येथे धरण क्षेत्रात सुद्धा पाउस जास्त पडला आहे, त्यामुळे पुण्याला फटका बसला आहे. मुंबई शहर आणि उपनगरमध्ये सुद्धा जोरदार पाऊस आहे. मुंबईत काही कोणत्याही आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सतर्क असून मी पुणे, रायगड, मुंबई जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्तांच्या संपर्कात आहे.

पुण्याला संबंधित लष्कर व नौदल अधिकाऱ्यांशी मी बोललो आहे. एखाद्या ठिकाणी लोक अडकले असतील तिथे प्रसंगी हेलीकॉप्टरने कसे त्यांना वाचवता येईल ते पाहण्यास सांगितले आहे. मुंबईत कुर्ला, घाटकोपर येथे साठलेले पाणी काढण्याचे काम सुरु आहे. मुंबईत २५५ पंप सुरु आहेत. मी मुंबई मनपा आयुक्तांना संपूर्ण यंत्रणा या कामी लावण्याचे निर्देश दिले आहेत असेही मुख्यमंत्री म्हणाले. मुंबईत पाऊस वाढल्याने मध्य पश्चिम आणि हार्बर रेल्वेच्या यंत्रणांना सज्ज ठेवलं आहे. पाउस आणि पूर परिस्थिती असलेल्या भागात शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे, माझं आपणास आवाहन आहे की नागरिकांनी घाबरून जाऊ नये. मंत्रालय तसेच जिल्हा पातळीवरून प्रशासन परिस्थितीवर संपूर्ण नजर ठेवून आहे आणि फिल्डवर उतरून काम करीत आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# जि. प. ठाणे येथिल नाविण्यपूर्ण उपक्रम कर्मचाऱ्यांचे ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट



जि.प.ठाणे, दि. २५– जिल्हा परिषदेतील सर्व विभागाकडील कर्मचारी यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज करताना संगणक हाताळणी, संगणकीय कामकाज व प्रशासकीय बाबी याकरिता साक्षर करण्यासाठी कर्मचाऱ्यांची ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट दि. २३ जुलै रोजी घेण्यात आली. शासनाकडून येणाऱ्या विविध योजना व मार्गदर्शक सुचना राबविण्याकरिता २६५ कर्मचारी यांचे ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात पार पडली.

कार्यालयीन कामकाजात कर्मचाऱ्यांना कामात येणाऱ्या अडचणींना लक्षात घेत १०० गुणांची ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट घेण्यात आली. दैनंदिन कामकाजात तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी तसेच दररोज नव्याने तांत्रिक बदल आत्मसात करण्यासाठी टेस्ट घेण्यात आली, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) अविनाश फडतरे यांनी दिली.

कनिष्ठ सहाय्यक १६०, वरिष्ठ सहाय्यक ६९, सहाय्यक प्रशासन अधिकारी १२, कनिष्ठ प्रशासन अधिकारी २४ असे एकूण २६५ कर्मचारी यांची ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट घेऊन डिजीटल माध्यमाचा वापर करण्यासाठी विशेष प्रयत्न जिल्हा परिषद ठाणे मार्फत करण्यात येत आहे.

ई–ऑफिस, वर्ड, एक्सेल, पॉवरपॉईंट, कॉम्प्युटराईज टिपणी लेखन, पत्र लेखन प्रशासकीय विषयावरील टिपणीलेखन इत्यादी बाबतची प्रात्यक्षिक टेस्ट घेण्यात आली आहे. कर्मचारी वर्गात यामुळे उत्साहाचे वातावरण दिसून आले व त्यांनी या निमित्ताने पुन्हा प्रशासकीय अभ्यासाचे पुनर्विलोकन केले. कर्मचारी यांच्या कार्यक्षमतेत वाढ करून लोकाभिमुक सेवा देण्यासाठी व प्रशासकीय कामकाज गतिमान करण्यासाठी लाभदायक ठरणार आहे.


Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/02910/18/23
Inquiry/case No. : ACC/II/969/2023
Name of the Trust : सय्यद रहीम शाह कादरी चॅरिटेबल ट्रस्ट
**Address of the Trust :** ४०१ डी विंग, चंद्रेश रिव्हिएॅरा सीएचएस लीमीटेड ए ते ई, विंग ६० फीट रोड लोधा, कॉमप्लेक्स मीरा रोड ईस्ट, ठाणे, ठाणे, ठाणे
**Name of the Applicant :** अमजद रहीम सैय्यद

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 10/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग,
निविदा सूचना

ठाणे महापालिका हद्दीतील कळवा मुंब्रा मतदार संघातील विटावा आई कुंकाई प्रवेशद्वार, कळवा नाका येथे "आमदार निधी" या लेखाशिर्षका अंतर्गत स्थापत्य कामे करणे या एकूण दोन कामांकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा सूचना व प्रपत्र संकेतस्थळ https:/mahatendrs.gov.in वर दि. २६.७.२०२४ते दि.०५.०८.२०२४ पर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि.०५.०८.२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.०६.०८.२०२४ रोजी १६.३० वा. उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारणे न दाखविता नाकारणेचा अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-क.प्र.स/१८४/२०२४-२५ सही/-
दि.२५.०७.२०२४ कार्यकारी अभियंता
**plsvisitourofficialweb-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**



ठाणे महानगरपालिका, ठाणे

आरोग्य विभाग अंतर्गत जन्म-मृत्यु विभाग
**निविदा सुचना**

ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग अंतर्गत जन्म-मृत्यु विभागाकडील लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.१५ (क) जयभवानीनगर स्मशानभुमी मध्ये स्वच्छ हवा कृती आराखडा योजना व एकात्मिक स्मशानभुमी नुतनीकरण कार्यक्रमाअंतर्गत २ PNG शवदाहिनी व १० पारंपारिक शवदाहिनीचे ५ वर्ष कालावधीकरीता निगा, देखभाल व परिचलन करणेकरीता ऑनलाईन ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in दि.२६/०७/२०२४ ते दि. ०९/०८/ २०२४ रोजी ११.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि.०९/०८/२०२४ रोजी ११.०० वाजेपर्यंत ऑनलाईन निविदा स्विकारणेत येतील दि.१२/०८/२०२४ रोजी १६.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य / १८२/ २०२४-२५ **सही/-**
दि:२५.०७.२०२४ उप आयुक्त (आरोग्य)
**pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01816/18/24
Inquiry/case No. : ACC/II/482/2024
Name of the Trust : अमन फाउंडेशन– काशिमीरा
**Address of the Trust :** 7TH फ्लोर, ७०४ रुहीना अपार्टमेंट, ए–विंग, एस. नं. १७ ५ १०, वेस्टर्न पार्क रोड, जरी गार्डनच्या जवळ, मीरा रोड, ठाणे, ठाणे, ठाणे
**Name of the Applicant :** तोहीद रफिक जगराळा

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 18/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01295/18/24
Inquiry/case No. : ACC/II/255/2024
Name of the Trust : अल नूर एज्युकेशनल अँड मेडिकल ट्रस्ट
**Address of the Trust :** ग्रेस स्क्वेंर एइ, एस. नं. ४३ & ४५/२, उप्कोमिंग स्टेडियमच्या समोर, कौसाच्या मागे, तलाव, मुंब्रा, ठाणे, ठाणे, ठाणे
**Name of the Applicant :** सिराज अहमद उबैदूर रहमान

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 18/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01942/18/24
Inquiry/case No. : ACC/II/541/2024
Name of the Trust : श्री हनुमान चरित्र चॅरिटेबल ट्रस्ट
**Address of the Trust :** १०१, बी–३, युनिक प्लाझा, शांती पार्क, मीरा रोड (पू.) ठाणे, ठाणे, ठाणे
**Name of the Applicant :** श्री. जगदीशचंद्र मागीलाल जोशी

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 18/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

जि. प. ठाणे येथिल नाविण्यपूर्ण उपक्रम

# कर्मचाऱ्यांचे ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट

ठाणे : जिल्हा परिषदेतील सर्व विभागाकडील कर्मचारी यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज करताना संगणक हाताळणी, संगणकीय कामकाज व प्रशासकीय बाबी याकरिता साक्षर करण्यासाठी कर्मचाऱ्यांची ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट दि. २३ जुलै रोजी घेण्यात आली. शासनाकडून येणाऱ्या विविध योजना व मार्गदर्शक सुचना राबविण्याकरिता २६५ कर्मचारी यांचे ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात पार पडली.

कार्यालयीन कामकाजात कर्मचाऱ्यांना कामात येणाऱ्या अडचणींना लक्षात घेत १०० गुणांची ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट घेण्यात आली. दैनंदिन कामकाजात तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी तसेच दररोज नव्याने तांत्रिक बदल आत्मसात करण्यासाठी टेस्ट घेण्यात आली, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) अविनाश फडतरे यांनी दिली.

कनिष्ठ सहाय्यक १६०, वरिष्ठ सहाय्यक ६९, सहाय्यक प्रशासन अधिकारी १२, कनिष्ठ प्रशासन अधिकारी २४ असे एकूण २६५ कर्मचारी यांची ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट घेऊन डिजीटल माध्यमाचा वापर करण्यासाठी विशेष प्रयत्न जिल्हा परिषद ठाणे मार्फत करण्यात येत आहे.

ई-ऑफिस, वर्ड, एक्सेल, पॉवरपॉईंट, कॉम्प्युटराईज टिपणी लेखन, पत्र लेखन प्रशासकीय विषयावरील टिपणी लेखन इत्यादी बाबतची प्रात्यक्षिक टेस्ट घेण्यात आली आहे. कर्मचारी वर्गात यामुळे उत्साहाचे वातावरण दिसून आले व त्यांनी या निमित्ताने पुन्हा प्रशासकीय अभ्यासाचे पुनर्विलोकन केले. कर्मचारी यांच्या कार्यक्षमतेत वाढ करून लोकाभिमुक सेवा देण्यासाठी व प्रशासकीय कामकाज गतिमान करण्यासाठी लाभदायक ठरणार आहे.



## कळवा प्रभाग समितीच्या हलगर्जीपणामुळे

# खारीगांव स्मशानभूमी पाण्याखाली

कळवा : प्रतिनिधी : गेल्या काही दिवसंपासून धो धो कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे व कळवा प्रभाग समिती प्रशासनामुळे खारीगांव स्मशनभूमी पाण्याखाली गेल्यामुळे गुरुवार सकाळी ८२ वर्षीय जेष्ठ नागरिकाचा मृतदेह नेताना त्याच्या नातेवाईकांना साचलेल्या पाण्यातून जाताना मोठी गैरसोयीला सामोरे जावे लागले.

कळवा प्रभाग समितीच्या अधिकाऱ्यांनी वेळेवर उपाययोजना न केल्याने स्मशनभूमीत पाणी साठले आहे त्यासाठी तातडीने उपययोजना करण्यासाठी आयुक्ताकडे मागणी करणार आहे.
-उमेश पाटील,
स्थानिक नगरसेवक
खारेगाव,

### मृतदेह घेऊन जाताना नातेवाईकांची तारांबळ



छाया : अशोक घाग

### कळवा प्रभाग समितीत अजून सहाय्यक आयुक्त हजर झाले नाहीत

ठाणे नाशिक आग्रा महामार्गखाली खारेगाव परिसरातील एकमेव स्मशानभूमी आहे गेले काही दिवस मुसळधार पावसामुळे खाडीला येणाऱ्या भरतीने व ठाणे नाशिक आग्रा महामार्गावर स्मशानभूमीच्या वरच्या भागात समृद्धी महामार्गाचे काम संत गतीने सुरू असल्याने पावसामुळे साठलेले पाणी खाली उतरल्याने हे पाणी स्मशानभूमीजवळ साठल्याने गुरुवारी सकाळी या स्मशानभूमीत मोठ्या प्रमाणात सगळीकडे पाणी साठले आहे.विशेष म्हणजे गेल्या आठवड्यात ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या ठिकाणी पाहणी करून कळवा प्रभाग समिती अधिकाऱ्यांना उपाययोजना करण्या संदर्भात सूचनाही दिल्या होत्या असे असताना कळवा प्रभाग समिती अधिकाऱ्यांनी कोणतीही हालचाल न केल्याने खारेगावच्या नागरिकांना गैरसोयीला तोंड द्यावे लागले.गुरुवारी पाणी भरल्याने घोलाई नगर डोंगर पट्ट्यातील शनिवार गुप्ता (वय ८२)यांचे वृद्धाकाळाने मृत्यू झाल्याने त्याच्या नातेवाईकांना स्मशानभूमीत साठलेल्या पाण्यातून वाट काढीत या मृतदेहावर अंत्यसंस्कार करावे लागले.

कळवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त सचिन बोरसे यांची गेल्या १५ दिवसापूर्वी दिवा येथे बदली झाल्यावर त्यांच्या जागी अक्षय गुडघे यांची नियुक्त करण्यात आली आहे परंतु ते अजूनही हजर झाले नाहीत त्यामुळे अधिकारी कामचुकारपणा करीत असल्याचा आरोप येथील नागरिकांनी केली आहे अधिकाऱ्यांनी हे पाणी उपसण्यासाठी कोणतेही सेक्शनपंप लावलेले नाहीत त्यामुळे पाण्याचा निचरा झालेला नसल्याने पाणी साठले आहे. तसेच कोणतीही उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे गैरसोय निर्माण झाली आहे.

# बदलापूरला पुराचा धोका, कल्याण-डोंबिवलीत काय स्थिती?

**ठाणे : बहुतांश भागात मुसळधार पाऊस सुरु आहे. पुणे, कोल्हापूर, मुंबई, ठाणे आणि रायगड या भागात जोरदार पाऊस कोसळतोय. त्यामुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे.**

पुण्याला पाणी पुरवठा करणाऱ्या पाणलोट क्षेत्रात मोठा पाऊस सुरु आहे. त्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने सिंहगड रोड परिसरात पूरस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी बोटीचा वापर कराव लागलाय.

आता मुंबईपासून काही अंतरावर असलेल्या बदलापूर संदर्भात मोठी बातमी आहे. बदलापूरच्या उल्हास नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. उल्हास नदीने १७.६० पातळी गाठली. बदलापूरच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय. नागरिकांनी गरज असेल तरच घराच्या बाहेर पडा असं प्रशासनाने आवाहन केलय. बदलापूरला पुराचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाकडून नदीकिनारच्या रहिवाशांना सतर्कतेचं आवाहन करण्यात आलय. नदीने २० मीटर पाणीपातळी गाठल्यास शहरात पूर येऊ शकतो.

कल्याण डोंबिवली परिसरातील पाणीपुरवठा बंद झाला आहे. कल्याण डोंबिवली परिसरातील पाणीपुरवठा बंद झाला आहे. मोहिली जलशुद्धीकरण केंद्रामध्ये उल्हास नदीचे पाणी शिरल्यामुळे जलशुद्धीकरण केंद्र बंद. मांडा, टिटवाळा, उंबरणी, बल्याणी, आटाळी, आंबिवली, मोहने, वडवली आणि कल्याण पश्चिमेसह पूर्व व डोंबिवली मधील काही भागात पाणीपुरवठा बंद राहणार आहे. नदीतील पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर जलशुद्धीकरण केंद्र चालू करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येणार असल्याची महानगरपालिकेची माहिती. कर्जतमध्ये ट्रॅकवर पाणी साचण्यात सुरुवात. मध्ये रेल्वेची रेल्वे सेवा अर्धा तास उशिराने. चाकरमानी वर्गांचे मोठे हाल.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना ठाणे यांच्याकडून महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रेरणा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे . यानिमित्ताने वृक्षारोपणाचा भव्य सोहळा शहापूर तालुक्यातील विविध गावांत साजरा करण्यात आला. यावेळी सुमारे २००० झाडांची वृक्ष लागवड करण्यात आली. शहापूर तालुक्यातील मौजे भरई, धसई व बामणे या गावांत वृक्ष लागवड व शाळकरी मुलांना एक मूल एक झाड असे वृक्ष वाटप करून वृक्षरोपण सोहळा अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये शाळकरी मुलांसाठी झाड दत्तक योजना जाहीर करण्यात आली.



याप्रसंगी शिक्षक आमदार व महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना प्रांताध्यक्ष अभ्यंकर यांनी शाळकरी मुले ग्रामस्थ व महाराष्ट्र शिक्षक सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना उद्देशून वृक्ष रोपणाचे मानवी संस्कृतीच्या संवर्धनासाठी असलेले महत्त्व विशद केले. त्याचबरोबर प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या शेकडो विद्यार्थ्यांशी वृक्षारोपण व त्याचे संवर्धन करण्याची गरज या विषयावर प्रश्नोत्तर सत्र व मार्गदर्शन करून वृक्ष लागवडीची गरज त्यांच्या बालमनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. मागील दोनशे वर्षात झालेल्या प्रचंड वृक्षतोडीमुळे जागतिक उष्मा वाढ व हवामान बदलाने मानवी जीवन व एकूणच निसर्ग यांच्यावर झालेला विपरीत परिणाम विद्यार्थ्यां लक्षात आणून त्यांना जास्तीत जास्त लागवडीबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी समन्वयक नितीन चौधरी, कल्याण विभागीय अध्यक्ष जगदीश भगत,कोकण कार्याध्यक्ष विलास अँग्रे, कोकण कायदेशीर सल्लागार व ठाणे अध्यक्ष संतोष गायकवाड, कमवि सरचिटणीस मुंबई विभाग मंगेश पाटील, वृक्षारोपण ठाणे जिल्हा समन्वयक सचिन जाधव,ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष शुभांगी निचीते,ठाणे जिल्हाध्यक्ष पाटील, माध्य / शहरी, ठाणे जिल्हाध्यक्ष माध्य / शहरी भगवान गावडे, ठाणे जिल्हाध्यक्ष, प्राथ. प्रमोद पाटोळे, ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष प्राथ. नवनाथ पवार, ठाणे जिल्हा संपर्कप्रमुख यमाध्यद्ध नरेंद्र शिंदे, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष यमाध्यद्ध तुकाराम खाटेघरे, ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष यमाध्यद्ध प्रकाश फर्डे, भिवंडी तालुकाध्यक्ष यप्राथद्ध रविंद्र तरे, ठाणे जिल्हा सचिव यमाध्यद्ध दिलीप चौधरी, शहापूर तालुका अध्यक्ष यमाध्यद्ध धनाजी धसाडे, शहापूर तालुका सचिव माध्य. महेंद्र गायकर इत्यादी शिक्षक सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसैनिक तसेच धसई ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, माथाडी कामगार जिल्हाध्यक्ष प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, बचत गट महिला प्रमुख, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

# पनवेलच्या गाढी नदीपात्रात मोटार अडकली

पनवेल : पनवेल तालुक्यामध्ये मागील २४ तासांमध्ये ११० मीलीमीटर पेक्षा अधिक पावसाची नोंद झाली. संततधारेमुळे काही ठिकाणी वगळता सखल भागात पाणी साचण्याच्या घटना गुरुवारी दुपारपर्यंत घडल्या नाहीत. गाढी नदीतील पाणी पातळी इशारा पातळीपेक्षा चार मीटरने कमी होती. परंतू पाण्याचा प्रवाह मोठा असल्याने नांदगाव पुलाखाली एक मोटार अडकल्याची घटना घडली. मुसळधारांमुळे आणि दुपारी समुद्राच्या मोठ्या भरतीमुळे महापालिकेने गुरुवारी शाळांना सकाळी सुट्टी जाहीर केली. सरकारी प्रशासनाचे लक्ष समुद्राच्या भरती आणि पडणाऱ्या पावसाकडे लागले आहे.

गाढी नदीतील नांदगाव पुलाखाली दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरु असते. परंतू नदीकाठी आज पाणी पातळीत वाढ झाल्याने मोटार या पाण्यात अडकली. मोटारीत बसलेल्या वाहनचालकावर बाका प्रसंग ओढावला. मात्र वाहनचालक सुखरूप मोटारीतून बाहेर पडला. मोटार पाण्यातून बाहेर काढण्यासाठी टोईंग व्हॅनची मदती घ्यावी लागली.

निम्मी मोटार नदीपात्रात अडकली होती. गुरुवारी पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे आपत्ती टाळण्यासाठी पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी सरकारी शाळा, खासगी व्यवस्थापनाच्या शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळा, प्रशिक्षण केंद्रांना सुट्टी देण्याविषयीचे परिपत्रक जाहीर केले होते. गुरुवारी सकाळपासून पनवेलमधील नद्या दुथडी भरुन वाहत होत्या. खाडी क्षेत्रातही पाणी पातळी वाढलेलीच होती.



ठाणे महानगरपालिकेच्या कळवा समिती अंतर्गत विकासक यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री हरित ठाणे अभियानांतर्गत खारीगाव येथील हिंदुहृदयम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडानगरी मैदानात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी ठाणे महानगरपालिकेचे वृक्ष प्राधिकरण अधिकारी दिनेश गावडे, मा. नगरसेवक उमेश पाटील, मा. नगरसेवक दिनेश कांबळे, सिकंदर केणी, बाळकृष्ण म्हात्रे, कळवा उपशहर प्रमुख राकेश पाटील, जय पाटील, विशाल खलाटे, सुजय पाटील, प्रशांत पाटील, उपशाखा संघटक रेखा रहाटे, उपशाखा संघटक प्रियांका भरम आणि ठाणे महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

श्वान पाळावयाचे असल्यास संबंधित विभाग कार्यालयामार्फत

# श्वान परवाना घेणे आवश्यक

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पाळीव श्वान मालकांकरिता जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११- कलम १४९ (१) व १२७ कलम २ (क) अन्वये 'नमुंमपा कुत्र्यावरील कर नियमन १९९३' ही उपविधी लागू करण्यात आलेली आहे व सदर उपविधीस शासन निर्णय क्र.एनएमसी १६९२/४१०/ सीआर४८/९२ नवी-२०, दि. २८ में १९९३ अन्वये शासन मान्यता मिळालेली आहे असे प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

या उपविधीनुसार विभाग कार्यालयांमार्फत विभाग अधिकारी यांच्या स्वाक्षरीने श्वान परवाने देण्याची कार्यवाही करण्यात येते असे सूचित करण्यात आलेले असून त्या अनुषंगाने सर्व पाळीव श्वान मालकांनी श्वान परवाना प्राप्तीसाठी संबंधित विभाग कार्यालयाकडे अर्ज करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना श्वान पाळावयाचे असल्यास त्यास श्वान परवाना घेणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने अनधिकृतपणे श्वान पाळणाऱ्या मालकांविरुध्द कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी असे महानगरपालिकेच्या वतीने जाहीर प्रकटनाव्दारे सूचित करण्यात आले आहे.

# कल्याण-डोंबिवली पालिकेच्या मोहिली जलशुध्दीकरण केंद्रात पाणी

कल्याण : कल्याण शहर परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या उल्हास नदी काठच्या मोहिली येथील जलशुध्दीकरण केंद्रात पहाटेपासून उल्हास नदीच्या पुराचे पाणी शिरले आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने पालिका प्रशासनाने या केंद्रातील पाणी उपसा पंप बंद ठेवले आहेत. त्यामुळे कल्याण पश्चिमेतील काही भाग, टिटवाळा परिसराला होणारा पाणी पुरवठा काही काळ बंद राहणार असल्याचे कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने जाहीर केले आहे.

कल्याण डोंबिवली शहरांना उल्हास नदी काठच्या मोहिली, बारावे येथील जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा केला जातो. उल्हास नदी रात्रीपासून मुसळधार पावसाने दुथडी भरून वाहत आहे. नदी काठी पालिकेचे मोहिली उदंचन आणि जलशुध्दीकरण केंद्र आहे. पहाटेपासून मोहिली जलशुध्दीकरण केंद्रात पुराचे पाणी शिरू लागले. त्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने उपसा पंप बंद करून केंद्रातून बाहेर पडणे पसंत केले.

हे पंप बंद राहणार असल्याने कल्याण पश्चिमेचा काही भाग, टिटवाळा, मोहने, आंबिवली, अटाळी, वडवली, उंबरणी, बल्याणी काही भागाचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे, असे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पुराचे पाणी ओसरू लागताच हे पंप पूर्ववत करण्यात येणार आहेत. त्यानंतर पाणी बंद असलेल्या भागाचा पाणी पुरवठा सुरळीत केला जाणार आहे. पुराचे पाणी मोहिली केंद्रात शिरले तरी केंद्रात न जाता दूरसंवेदन यंत्रणेतून हे पंप चालू करणे, बंद करण्याची अत्याधुनिक यंत्रणा पालिका प्रशासनाने या केंद्रात बसवली आहे.

# ऐतिहासिक घोडबंदर किल्ला भाडे तत्वावर देण्याचा कोणताही मानस नाही : आयुक्त

### मानवीय चुकीमुळे शिवप्रेमी व जनतेची दिशाभुल झाली याबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाकडून दिलगिरी व्यक्त

भाईंदर : प्रशासकीय सभेतील ठराव क्र. ०१ अन्वये महानगरपालिकेच्या काही मालमत्ता संचलन/भाडे तत्वावर देण्याबाबत तांत्रिक व कुशल मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे निविदा प्रकियेद्वारे एजन्सी नियुक्त करण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला होता. सदर ठरावामध्ये प्रातिनिधीक स्वरुपात मालमत्ता, रस्ते, सार्वजनिक जागांबाबत उल्लेख करण्यात आला आहे.

सदर ठरावानंतर ऐतिहासिक घोडबंदर किल्ला भाडेत्वावर चालवण्यास देण्याचा वादग्रस्त निर्णय महापालिकेने घेतला याबाबतचे वृत्त लोकसत्ता वृत्तपत्रात आले होते. प्रशासकीय सभेतील ठराव यादीमध्ये नजरचुकीने ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याचा उल्लेख करण्यात आला असे निर्दशनास आले. सदरचा उल्लेख हा नजरचुकीने झालेला असून ती मानवीय चुक झाली असल्याचे संबंधित विभागामार्फत सांगण्यात आले आहे. ऐतिहासिक घोडबंदर किल्ला हा महानगरपालिकेचया मालकीचा नसल्याने भाडे तत्वावर देण्याचा महानगरपालिकेचा कोणताही मानस नाही. मानवीय चुकीमुळे शिवप्रेमी व जनतेची दिशाभुल झाली याबद्दल प्रशासनाकडून दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे. तसेच सदरच्या ठरावात दुरुस्ती करुन नव्याने ठराव पारित करण्यात येईल असे प्रतिपादन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी केले आहे.




ऐतिहासिक घोडबंदर किल्ला भाडे तत्वावर देण्याच्या विरोधात नागरिकांमध्ये कमालीची नाराजी उमटत असून तत्काळ हा निर्णय रद्द करावा यासाठी आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये

# सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर भरती

ठाणे : जिल्हा परिषद ठाणे, प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांमधून पात्र उमेदवारांची उपशिक्षक, पदवीधर शिक्षक या पदावर एकत्रित मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी समक्ष अर्ज मागविण्यात येत आहे.

एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने सेवानिवृत्त शिक्षक नेमणूका या पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये नियमित शिक्षक भरती होईपर्यंत करण्यात येत आहेत. उमेदवाराचे नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष असणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त असलेले शिक्षक, कंत्राटी शिक्षक पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील. मासिक मानधन रुपये २०,०००/- प्रतिमाह (इतर कोणतेही लाभाव्यतिरिक्त) दिले जाईल.

इच्छुक उमेदवारांनी अर्ज दि. २६ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) ठाणे जिल्हयातील आपल्या लगतच्या / सोयीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती अंबरनाथ, भिवंडी, कल्याण, मुरबाड व शहापूर या कार्यालयात जमा करावेत. तसेच अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषद ठाणेच्या https://zpthane.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून घ्यावे असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची आपत्कालीन मदत यंत्रणा कार्यरत

## सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे निर्देश आयुक्त मंगेश चितळे यांचे आदेश

पनवेल : पनवेल महापालिका क्षेत्रात जोरदार पर्जन्यवृष्टी होत असून भारतीय हवामान विभागाने २६ जुलैला रायगड जिल्ह्यात रेड अलर्ट दिला असून मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. दरम्यान गुरूवारी पहाटेपासूनच पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात मुसळधार पाऊसास सुरूवात झाली असून, या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन अलर्ट मोडवर असून पाणी साठणाऱ्या भागावरती अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे निर्देश आयुक्त मंगेश चितळे यांनी दिले आहेत.

जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना चोवीस तास सतर्कता बाळगण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. दरम्यान अतिरीक्त आयुक्त भारत राठोड यांनी कळंबोलीमधील विविध भागांना भेट देऊन परिस्थितीची पहाणी केली. कळंबोली मधील २९ पंपाच्या माध्यमातून रस्त्यावरील पाणी काढण्यात येत असून याठिकाणी कोठेही पाणी साठणार याची काळजी महापालिकेच्यावतीने घेण्यात येत आहे. तसेच अतिरीक्त आयुक्त व उपायुक्त कैलास गावडे यांनी पनवेल शहरातील कोळीवाडा ,पटेल मोहल्ला,भारत नगर झोपडपट्टी इत्यादी ठिकाणी पूर परिस्थितीची



पाहणी केली.

गाढी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्या मुळे कच्छी मोहल्ला व पटेल मोहल्ला येथील नागरिकांना सुरक्षित जागी उर्दु प्राथमिक शाळा येथे स्थलांतरीत करण्यात आले असून व त्यांच्या चहा ,जेवण, आरोग्य सेवा व पाण्याची सोय पनवेल महानगरपालिका तर्फे करण्यात आली. तसेच वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने मदत सुरू करण्यात आली आहे. हवामान खात्याने शुक्रवारी देखील रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी महापालिकेच्यावतीने सर्व तयारी करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली आहे.

चारही प्रभागातील प्रभाग अधिकाऱ्यांना त्या त्या विभागातील अद्ययावत माहिती देण्याविषयी आयुक्तांनी सूचित केले आहे. कळंबोली मध्ये भरपूर पाणी साठते, त्यामुळे कळंबोली मधील पाणी उपसा करणारे डिझेल व इलेक्ट्रिक पंप सातत्याने सुरु ठेवण्याच्या सूचना प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच पनवेल मध्ये गाढी नदीच्या पाणी पातळीवर देखील लक्ष ठेऊन याबाबतची माहिती देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

नागरिकांची सुरक्षितता व काळजी घेण्यासाठी महापालिका तत्पर असून कोणत्याही परिस्थितीत नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन आयुक्त श्री. मंगेश चितळे यांनी केले आहे. महापालिकेच्या सर्व विभागांनी आयुक्तांच्या निर्देशानुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून अलर्ट मोड' वर काम करावे, योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त व उपायुक्तांनी महापालिकेच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.












# नवी मुंबई महानगरपालिकेची आपत्कालीन मदत यंत्रणा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार दक्षतेने सज्ज

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात रात्रीपासून सुरु असलेली जोरदार पर्जन्यवृष्टी बघता तसेच हवामान विभागाकडून जाहीर करण्यात आलेल्या अतिवृष्टीच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभागांतील मदत यंत्रणेस सज्ज राहण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने देण्यात आले होते.

त्यानुसार आयुक्तांनी सकाळीच महानगरपालिका मुख्यालयातील आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाला भेट देत नवी मुंबई शहरातील परिस्थितीचा विभागनिहाय आढावा घेतला आणि संबधित विभागप्रमुखांनी व विभाग अधिकारी यांनी आपल्या क्षेत्रात जाऊन तेथील परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याचे निर्देशित केले. त्यानुसार सर्व संबधित अधिकारी व कर्मचारी आपापल्या कार्यक्षेत्रात विशेषत्वाने पाणी साचण्याच्या संभाव्य ठिकाणी लक्ष ठेवून होते.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त आदेशानुसार पावसाची स्थिती बघता आज २५ जुलै रोजी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली. जे विद्यार्थी सकाळच्या सत्रात शाळेत आले होते ते सुरक्षितपणे घरी पोहोचतील याची दक्षता घेण्याचे मुख्याध्यापक व शिक्षकांना निर्देशित करण्यात आले होते व दुपारच्या सत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली.

दि. २४ जुलै २०२४ रोजी सकाळी ८.३० पासून दि. २५ जुलै २०२४ रोजी सकाळी ८.३० पर्यंत २४ तासात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सरासरी ६७.४३ मि.मी. पावसाची नोंद झाली असून त्यामध्ये बेलापूर विभागात ५२.६० मि.मी., नेरुळ विभागात ३३.२८ मि.मी., वाशी विभागात ५४.१० मि.मी., कोपरखैरणे विभागात ७३.१५ मि.मी., ऐरोली विभागात ४९.५० मि.मी., दिघा विभागात १४२ मि.मी इतक्या मोठया प्रमाणात पर्जन्यवृष्टी नोंदीत झालेली आहे.

त्याचप्रमाणे दि. २५ जुलै २०२४ रोजी सकाळी ८.३० पासून सायंकाळी ४.३० पर्यंत नमुंमपा क्षेत्रात सरासरी ६०.४१ मि.मी. पावसाची नोंद



झाली असून त्यामध्ये बेलापूर विभागात ८८.६० मि.मी., नेरुळ विभागात ६०.२० मि.मी., वाशी विभागात ४५.७१ मि.मी., कोपरखैरणे विभागात ९५.७६ मि.मी., ऐरोली विभागात ३४.६० मि.मी., दिघा विभागात ३७.६० मि.मी इतक्या मोठया प्रमाणात पर्जन्यवृष्टी नोंदीत झालेली आहे. या मोठया प्रमाणावर सातत्याने पडणाऱ्या पावसाच्या अनुषंगाने तसेच दुपारी २.५१ वा. ४.५४ मीटर उंचीची उधाण भरती असल्याने व नवी मुंबई शहर समुद्रसपाटीच्या भरती रेषेपासून खालच्या पातळीवर वसलेले असल्याने त्याच कालावधीत मोठया प्रमाणात पाऊस सुरु राहिल्यास शहरातील काही सखल भागात पाणी साचण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहून आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे असे आवाहन विविध समाज माध्यमांतून व्यापक प्रमाणात करण्यात आले होते.

रविवार दि.२१जुलै रोजी २४ तासात नवी मुंबई क्षेत्रात सरासरी १३९.७३ मि.मी. इतक्या मोठया प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाली होती. या दिवशी दुपारी १२.१० वा. ४.४४ मीटरच्या उधाण भरतीच्या काळातच मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाली त्यामुळे शहरातील काही अतिसखल भागात पाणी साचल्याचे निदर्शनास आले. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, आपत्कालीन व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांच्यासह शहरातील विविध ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी करत आपत्कालीन मदत कार्याला गती दिली. तसेच सेक्टर ८ ए दुर्गामाता नगर परिसरातील धबधब्याच्या ठिकाणी अडकलेल्या ६० हून अधिक पर्यटकांच्या बचाव कार्याच्या ठिकाणालाही आयुक्तांनी भेट दिली होती.

यानंतर दुसऱ्या दिवशी आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनानुसार अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी संबधित अधिकाऱ्यांसह आदल्या दिवशी पाणी साचलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन व तेथील नागरिकांशी संवाद साधून स्थळपाहणी केली व कारणमीमांसा जाणून घेण्याकरिता आढावा घेतला. त्यामध्ये प्रामुख्याने लक्षात आलेली बाब म्हणजे पावसाळी कालावधीत ज्या होल्डींग पाँडमुळे शहराचे पावसाळी पाण्यापासून रक्षण होते अशा ११ होल्डींग पाँडची पावसाचे पाणी धारण करण्याची क्षमता त्यात मोठया प्रमाणात गाळ जमा झाल्याने व खारफुटींचीही वाढ झाल्याने कमी झालेली आहे.

मनसेच्या आरोपामुळे खळबळ

## जाहीरात फलक मालक आणि अधिकाऱ्यांमध्ये भागीदारी

ठाणे : मुंबई येथील घाटकोपर भागातील जाहिरात फलक दुर्घटनेनंतर ठाणे महापालिका क्षेत्रातील बेकायदा तसेच परवानगीपेक्षा जास्त आकाराचे फलक उभारण्यात आल्याचा मुद्दा गाजत असतानाच, त्यावर पालिकेकडून केवळ हे फलक काढून टाकण्यापुरतीच कारवाई होत असल्याच्या कारणावरून पालिकेवर टीका होऊ लागली आहे. याच मुद्द्यावरून जाहीरात विभागातील अधिकारी आणि जाहिरात फलकांचे मालक यांच्यातील भागीदारीमुळेच कठोर कारवाई करण्याऐवजी केवळ बघ्याची भूमिका घेतली जात असल्याचा गंभीर आरोप मनसेच्या स्थानिक नेत्यांनी केला आहे. तसेच या दोघांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करत तसे झाले नाहीतर न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

मुंबईतील घाटकोपर भागात जाहिरात फलक कोसळून नागरिकांचा मृत्यु झाला. या घटनेनंतर ठाणे शहरातील जाहीरात फलकांचा मुद्दा ऐरणीवर आला. या फलकांच्या मुद्द्यावरून टिका होऊ लागताच पालिकेने त्यावर कारवाईचा बडगा उगारला. शहरातील ४९ फलकांवर पालिका प्रशासनाने कारवाई केली. त्यात ५ जाहिरात फालक पुर्णपणे निष्काषित केले तर, परवानगीपेक्षा जास्त आकाराच्या ४४ फलकांचे पत्रे काढण्यात आले. असे असले तरी अशाप्रकारे नियमबाह्य फलक उभारणाऱ्यांवर पालिकेकडून मात्र कोणतीच कारवाई होताना दिसून आलेली नाही. याच मुद्द्यावरून पालिका प्रशासनावर टिका होत असतानाच, आता महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी हा मुद्दा उपस्थित करत या संदर्भात ठाणे महापालिका आयुक्तांना पत्र दिले आहे.

घाटकोपर दुर्घटनेनंतर खडबडून जागे झालेल्या ठाणे महापालिकेने शहरात परवानगी पेक्षा जास्त आकाराच्या ४४ जाहिरात फलकांचा अतिरिक्त भागाचा फक्त पत्रा काढण्याची कारवाई केली. जाहिरात फलक कंपनी आणि महापालिका अधिकारी यांच्यात भागीदारी असल्यामुळेच कठोर कारवाई करण्यात येत नसून केवळ बघ्याची भूमिका घेतली जात आहे. गेली कित्येक वर्षे जाहिरातबाजी करून पैसे कमविणाऱ्या जाहिरात फलक मालकांना कोणताही दंड ठोठावण्यात आला नसून महापालिका फक्त कारवाईचा दिखावा करत आहे, असा आरोप पाचंगे यांनी केला आहे. पालिकेने तात्काळ सर्व ४९ जाहिरात फलक मालकांविरुद्ध तसेच जाहिरात फलक उभारणीसाठी परवानगी देताना खोटा स्थळ पाहणी अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पुढील ८ दिवसांत ही कारवाई केली नाहीतर न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

शहरातील महत्वाचे रस्ते, चौकातील मोक्याच्या जागा पकडून तेथे लोखंडी होर्डिंग उभारले जातात. हे होर्डिंग उभारताना महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र व्यवसायिक आणि अधिकारी याकडे सोईस्कर दुर्लक्ष करतात, त्यामुळे अनधिकृत होर्डिंगची संख्या दिवसागणित वाढत आहे. महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचना क्र ५ नुसार जाहिरात फलक प्रदार्शित करण्यावरील निर्बंधांमध्ये पदपथावर आणि सार्वजनिक रस्त्यावर कोणताही जाहिरात फलक उभारण्यास मनाई आहे. जाहिरात फलक परवानगी घेतलेल्या भूखंडाच्या बाहय सीमा रेषे बाहेर येता कामा नये, खाडीत होर्डिंग उभारता येणार नाही यांसारख्या अटींचे पालन अजूनही होताना दिसत नाही, असा आरोप पाचंगे यांनी केला आहे.

## नागरिकांनी महसूल सप्ताहाचा लाभ घ्यावा : विभागीय महसूल आयुक्त पी.वेलरासू

नवी मुंबई : महसूल विभागामार्फत राज्यात १ ऑगस्ट हा महसूल दिन साजरा करण्याबरोबरच १ ते ७ ऑगस्ट २०२४ या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या सात दिवसात कोकणातील प्रत्येक जिल्हयात शासनाने दिलेल्या सूचनांबरोबरच नाविण्यपूर्ण उपक्रम राबवावेत, असे आवाहन विभागीय महसूल आयुक्त पी.वेलरासू यांनी केले आहेत.

या सप्ताहात महसूल विभागाने जिल्हास्तरीय महसूल कामे वेळेत पूर्ण करून त्यानुसार अभिलेख अद्ययावत करणे, वसूलीच्या नोटीसा पाठवणे, मोजणी करणे इत्यादी कामे वेळापत्रकानुसार करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा आणि महसूल उद्दिष्ट पूर्ण करणारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यासाठी १ ऑगस्ट रोजी 'महसूल दिन' साजरा करण्यात येणार आहे.

ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीने महसूल दिन आणि महसूल सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे.

ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री युवा कार्या प्रशिक्षण योजनेतर्गत जास्तीत जास्त युवकांना लाभ मिळवून देण्याकरीता अधिवास प्रमाणपत्र, आधारकार्ड इत्यादी आवश्यक कागदपत्रे तातडीने उपलब्ध व्हावीत यासाठी विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

ऑगस्ट रोजी सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिक जे ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनंतर्गत राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटी/दर्शनाच्या संधीचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, दाखले, प्रमाणपत्रे,तातडीने उपलब्ध व्हावीत यासाठी विशेष शिबारांचे आयोजन करण्यात येणार आहेत.

ऑगस्ट रोजी स्वच्छ सुंदर माझं कार्यालय ही विशेष मोहीम राबवून जिल्हा, तालुका, मंडळ व ग्रामस्तरावरील कार्यालय व परिसरातील स्वच्छता करण्यात येणार आहे. कार्यालयाचे अभिलेख व दस्तऐवज यांचे वर्गिकरण, व्यवस्थापन, संगणकीकरण यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

ऑगस्ट रोजी सीमेवर तैनात सैनिक तसेच शहिदांच्या कुटूंबीयांना मदत, त्यांना जमीन वाटप, संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी 'सैनिक हो तुमच्यासाठी' या कार्यक्रमाचे आयोजन.

ऑगस्ट रोजी एक हात मदतीचा दिव्यांगाचा कल्याणाचा या उपक्रमातर्गत दिव्यांग व्यक्तींकरीता शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमाची माहिती तसेच या योजनांचा लाभ घेण्याकरीता आवश्यक असणाऱ्या महसूल विभागांशी संबधित विविध दाखले व प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

विविध योजनांतर्गत दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या लाभांच्या अनुषंगाने जिल्हा, तालुकास्तरावर शिबीर आयोजित करुन स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने उपकरणांचे वाटप करण्यात येणार आहे.

ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील जिल्हयात कार्यरत असलेल्या सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित बाबी निकाली काढण्यासाठी 'महसूल संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांशी संवाद' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.







बदलत्या महाराष्ट्राचे प्रतिक...
१३ वा वर्धापन दिन
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक
महाराष्ट्र सम्राट
वृत्तपत्रास...
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
डॉ.बालाजी किणीकर
आमदार - अंबरनाथ विधानसभा


१३ वा वर्धापन दिन
शिवसेना
एक विश्वासार्ह मराठी वृत्तपत्र
म्हणून ओळख असलेल्या...
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक
महाराष्ट्र सम्राट
वृत्तपत्रास
वर्धापन दिन
निमित्त...
हार्दिक शुभेच्छा
सर्व कर्मचाऱ्यांचे
मनःपूर्वक
अभिनंदन !
श्री.संजय मोरे
शिवसेना सचिव
सौ.सुखदा संजय मोरे
मा.नगरसेविका-ठा.म.पा.


अल्पावधीतच वाचकांच्या
पसंतीस आलेले वृत्तपत्र...
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक
महाराष्ट्र सम्राट
१३ वा वर्धापन दिन
वृत्तपत्रास...
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !
श्री.राजन किणे
मा.ज्येष्ठ नगरसेवक : ठा.म.पा.
प्र.क्र.(31) मुंब्रा,ठाणे
सौ.अनिता किणे
मा.नगरसेविका : ठा.म.पा.
प्र.क्र.(26) मुंब्रा,ठाणे
मोरेश्वर किणे
मा.नगरसेवक : ठा.म.पा.
करण रा.किणे
युवा नेतृत्व


सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक
महाराष्ट्र सम्राट
वृत्तपत्रास...
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !
व सर्व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !
१३ वा वर्धापन दिन
शुभेच्छुक
श्री.राम रेपाळे
मा.सभापती,स्थायी समिती ठा.म.पा.
शिवसेना ठाणे शहरप्रमुख-को.पां.वि.सभा